## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( माहितीच्या नियमित नोंदी, ठेवणे व सादर करणे) विनियम, २००८

अनुक्रमणिका

१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ...........२

२. व्याख्या ..................................३

३. माहिती ठेवणे..............................४

४. माहिती सादर करणे........................५

५. वाटपाची तत्त्वे.............................७

६. महत्त्वपूर्ण बाब..............................९

७. संकीर्ण.....................................९

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( माहितीच्या नियमित नोंदी, ठेवणे व सादर करणे) विनियम, २००८

### विद्युत अधिनियम, २००३

क्रमांक मविनिआ/प्रशासन/२११/२००७-०८---------विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१ आणि ६२ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ मधील विनियम ७ व ८ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालीलप्रमाणे विनियम करीत आहे-

### १. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ

१.१ या विनियमांना " महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (माहितीच्या नियमित नोंदी, ठेवणे व सादर करणे) विनियम, २००८" असे म्हणावे.

१.२ हे विनियम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात व आयोगाच्या कार्यकक्षेखाली येणा-या सर्व बाबींना लागू राहतील.

१.३ हे विनियम ज्या दिनांकास शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

### विनियम कोणाला लागू असतील

१.४ सर्व परवानेधारक, विद्युत निर्मिती कंपन्या आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करणारे परवानेधारक, जे अधिनियमाच्या कलम ६४ खाली वीज दर निश्चित करण्याकरिता अर्ज सादर करतात किंवा वीज दर विनियमांच्या विनियम १७.२ खाली वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी अर्ज सादर करतात आणि महाराष्ट्र राज्यात ज्यांचे नियमन आयोगाकडून करण्यात येते, त्या सर्वांना हे विनियम लागू असतील.

## २. व्याख्या

या विनियमात जर वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर-

अ) **“अधिनियम”** म्हणजे विद्युत अधिनियम ( २००३ चा ३६), त्यात केलेल्या सुधारणांसह;

ब) **“ लेखापरीक्षक”** म्हणजे स्वतंत्र नोंदणीकृत कंपनी लेखापरीक्षक किंवा आयसीएआय कडे नोंदणी केलेला सनदी लेखापाल;

क) **“ आधार लेखे”** म्हणजे परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करणारा परवानाधारक यांचे लेखापरिक्षीत लेखे ज्यामध्ये अशा परवानाधारक आणि विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करणारा परवानाधारक यांच्या कार्याबाबतच्या आर्थिक व आर्थिकेतर बाबींची संपूर्ण माहिती, ज्यामध्ये कंपनी अधिनियम, १९५६ खाली तयार केलेल्या वैधानिक लेख्यांचा, मर्यादांचे बंधन नसेल अशा संपूर्ण माहितीसह, समावेश असेल;

ड) **“आयोग”** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

इ) **“आर्थिक लेखा वर्ष”** म्हणजे प्रत्येक परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करणारा परवानाधारक, यांच्यासाठी ठरवून देण्यात आलेला, जो लेखापरिक्षीत लेख्यांमध्ये समाविष्ट असेल असा विशिष्ट कालावधी;

एफ) **“कार्यात्मक विभाग”** म्हणजे महाराष्ट्र राज्यातील विनियमित व्यवसायाचा विद्युत निर्मिती, पारेषण व वितरण व्यवसाय;

जी) **“विनियमित व्यवसाय”** म्हणजे महाराष्ट्र राज्यातील आयोगाने विनियमन केलेला व्यवसाय;

एच) **“वीज दराचे विनियम”** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५, वेळोवेळी अंमलात असल्याप्रमाणे.

येथे वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग यांना अधिनियम, नियम आणि विनियमात नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

## ३. माहिती ठेवणे

३.१ प्रत्येक परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, विद्युत निर्मिती व्यवसाय, परवानाप्राप्त व्यवसाय[१] आणि अन्य व्यवसाय[२] यांच्यासंबंधात प्रत्यक्ष रकमांवर आधारित वाटप विवरणपत्रांचा समावेश असलेली, वेगवेगळी आर्थिक, कार्यविषयक आणि लेख्यांबाबतची माहिती, त्यास पुष्ट्यर्थ प्रमाणके (व्हाउचर) आणि रोजकीर्दीतील (जर्नल) नोंदीसह, ठेवेल.

**स्पष्टीकरण-१ –**लेखे लिहिणे व सादर करणे यांची व्यवस्था अशा रितीने असेल की, प्रमाणकाच्या स्तरावर तिचा पडताळा घेता येणे शक्य होईल. जोडपत्रातील नमुन्यांप्रमाणे ठेवण्यात आलेल्या आंकडेवारीवरुन उपलब्ध होणारी माहिती, सुसंबध्दतेला किंवा विश्वासार्हतेला तडा जाऊ न देता समजण्यास सर्वात सोपी असेल.

---

[१] परवानाप्राप्त व्यवसाय म्हणजे वितरण परवाना विनियम किंवा पारेषण परवाना विनियमांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला व्यवसाय

[२] अन्य व्यवसायाचा अर्थ विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४१ आणि ५१ च्या संदर्भात राहील.

**स्पष्टीकरण-२** - जोडपत्रांतील नमुन्यांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या माहितीतील ज्या नोंदींसाठी प्रमाणके नसतील उदा. प्राप्ती-कर आणि अन्य वैधानिक आवश्यकता, ती माहिति पुष्टी देणा-या प्रमाणकांशिवाय ठेवण्यात येईल.

३.२ वरील माहितीशिवाय प्रत्येक वितरण परवानाधारक, विजेचे वहन आणि किरकोळ पुरवठा या व्यवसायांसंबंधात वेगवेगळी माहिति प्रत्यक्ष रकमांवर आधारित वाटप विवरणपत्रांसह ठेवेल.

३.३ प्रत्येक परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, जोडपत्रांतील नमुन्यांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली माहिती, प्रत्यक्ष महसूल आणि खर्चाच्या आंकडेवारीसह आयोगास तिमाही तत्त्वावर पाठविणे शक्य होईल, अशा रितीने ठेवेल.

३.४ वर काहीही नमूद केले असले तरी, प्रत्येक परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, यांना आणखी किंवा अधिक सविस्तर माहिति ठेवण्याचे निर्देश आयोग देऊ शकेल.

## ४. माहिती सादर करणे

४.१ प्रत्येक परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, या विनियमांसोबतच्या जोडपत्रांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नमुन्यांनुसार आर्थिक लेखा वर्षा संबंधातील आकडेवारी तिमाही तत्त्वावर आयोगास सादर करेल.

**स्पष्टीकरण-१** - जोडपत्रांच्या नमुन्यांमध्ये भरलेली माहिती आणि आयोगाने निर्देश दिल्याप्रमाणे सादर करावयाच्या माहितीमध्ये संबंधित तिमाहीकरिता

प्रत्यक्ष महसूल आणि खर्चाची आकडेवारी असेल व ती नियंत्रण कालावधीकरिता आयोगाने मंजूरी दिलेले संबंधित वर्षाच्या टप्प्यावरील अंदाजित परिमाण नसेल.

**स्पष्टीकरण-२** - जोडपत्रांच्या नमुन्यांमध्ये भरलेली माहिती आणि आयोगाने निर्देश दिल्यप्रमाणे सादर करावयाच्या माहितीमध्ये विशेषतः सामाईक मत्ता व खर्चांचे वाटप कोणत्या आधारे केले याची माहिती असेल तसेच त्यासोबत प्रत्यक्ष आर्थिक आणि लेखाविषयक माहिती आणि खर्चाच्या वाटपाची सविस्तर गणना व स्पष्टीकरणचही समावेश असेल.

४.२ वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आयोगाला सादर करावयाची माहिती, ही विचाराधीन असलेल्या तिमाहीकरिता प्रत्यक्ष माहिती, विद्युत निर्मिती व्यवसाय किंवा परवानाप्राप्त व्यवसाय किंवा अन्य व्यवसायाची, जसे असेल तसे, प्रत्यक्ष लेखापरिक्षीत लेखा खर्चाची नोंद ज्या सर्वसाधारण खातेवहीमध्ये होते त्यामधून थेट घेण्यात येईल.

४.३ वर काहीही नमूद केले असले तरी, आर्थिक लेखा कालावधीच्या शेवटी लेखापरिक्षीत एकत्रित माहिती देखील आयोगाला सादर करण्यात येईल.

४.४ प्रत्येक परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, लेखापरिक्षीत वार्षिक लेख्यांमधून वेगवेगळ्या व्यवसायांखालील विभागांचे मेळ पत्रक आणि अशा मेळ पत्रकांचा आधार, आर्थिक वर्ष संपल्यानंतर एकशे ऐंशी दिवसंच्या आत आयोगाला सादर करेल.

## ५. वाटपाची तत्त्वे

५.१ लेखापरिक्षीत वार्षिक लेख्यांमधील बाबींचे वाटप खालील तत्त्वांवर आधारित असेल-

एक) ज्या बाबी परवानाप्राप्त व्यवसाय किंवा विद्युत निर्मिती कंपनीच्या किंवा परवानाधारक विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असल्यास त्यांच्या विद्युत निर्मिती व्यवसायाशी थेट संबधित असतील, त्या बाबींचे त्याप्रमाणे वाटप करण्यात येईल; आणि

अ. ज्या बाबी कार्यात्मक विभागाशी थेट संबंधीत असतील त्या बाबींचे त्याप्रमाणे वाटप करण्यात येईल;

ब. ज्या बाबी कार्यात्मक विभागाशी थेट संबंधीत नसतील त्या बाबींचे वाटप समुचित वाटप-सूत्रांचा उपयोग करुन त्याप्रमाणे करण्यात येईल;

दोन) ज्या बाबी परवानाप्राप्त व्यवसाय किंवा विद्युत निर्मिती कंपनीच्या किंवा परवानाधारक विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असल्यास त्यांच्या विद्युत निर्मिती व्यवसायाशी थेट संबधित नसतील, त्या बाबींचे वाटप समुचित वाटप-सूत्रांचा उपयोग करुन त्याप्रमाणे करण्यात येईल;

५.२ सामाईक बाबी ज्यांचे थेट संबंध जोडता येत नसतील अशा बाबींचे वाटप हेतू लक्षात घेऊन करण्यात येईल.

५.३ वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जी माहिती आयोगाला सादर करणे आवश्यक असेल त्या माहितीमध्ये प्रमाणकाच्या स्तराशी निगडीत असलेल्या विभाग निहाय विभागणीचा समावेश असेल आणि संकेत शब्दांची रचना अशी असेल की ज्यामुळे प्रत्येक व्यवहार हा, नेहमीच्या लेखाविषयक-संकेत शब्दांसह, स्थळ/युनिटच्या संकेत शब्दांशी जोडता येऊ शकेल.

५.४ प्रत्येक  परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, अशा वाटपामागच्या कारणमीमांसेला पुष्टी, वाटपासाठी वापरण्यात आलेल्या संख्यात्मक गुणकासह देईल.

५.५ आयोगाने अन्य निर्देश दिले नसतील तर, आयोगास जी माहिती या विनियमांप्रमाणे सादर करणे आवश्यक असेल ती माहिती एका कालावधीसाठी सादर करण्यात आल्यानंतर पुढील कालावधीकरिता सातत्त्याने सादर करण्यात येईल.

५.६ या विनियमांखाली आयोगास सादर करावयाच्या माहिती दोन स्तरावर सादर करण्यात येईल-

अ) लेखापरिक्षीत लेख्यांचे मेळ, विनियमित व्यवसाय आणि अन्य व्यवसाय अशी विभागणी करुन कोणत्याही समायोजनेशिवाय, घालण्यात येईल.

ब) विनियमित व्यवसायांखालील, विद्युत निर्मिती, पारेषण आणि वितरण वहन व्यवसाय आणि वितरण किरकोळ पुरवठा व्यवसाय असे प्रत्येक व्यवसायात उचित समायोजन करण्यात येईल.

५.७ प्रत्येक परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, आयोगास-

- लेखापरिक्षीत लेखे;
- ज्याच्या आधारे लेख्यांचे लेखापरिक्षण केलेले आहे असा लेख्यांचा तक्ता  सादर करेल.

**स्पष्टीकरणः** उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती विनियमांशी सुसंगत असेल आणि अर्थनिश्चिती व तुलना करण्यास साह्यकारी असेल याची खात्री करण्यासाठी, प्रत्येक  परवानाधारक, विद्युत निर्मिती कंपनी आणि विद्युत

निर्मितीचा देखील व्यवसाय करीत असलेला परवानाधारक, कंपनी अधिनियम, १९५६ मधील अनिवार्य शीर्ष अनुसरेल.

**६. महत्वपूर्ण बाब**

६.१ जी माहिती वगळल्याने, गैर-कथन केल्याने किंवा प्रकट न केल्याने, विद्युत निर्मिती व्यवसाय, परवानाप्राप्त व्यवसाय किंवा अन्य व्यवसायाची आर्थिक पररिस्थिती समजून घेण्यास बाधा येण्याची शक्यता असल्यास अशी बाब महत्वपूर्ण असेल.

६.२ वर काहीही नमूद केले असले तरी, आयोगाला लेखी कारणे नमूद करुन वाटपाच्या आधारात सुधारणा, फेरफार, बदल करता येतील.

**७. संकीर्ण**

**७.१ सुधारणा करण्याचे अधिकार**

आयोगाला कोणत्याही वेळी या विनियमातील कोणत्याही तरतुदीत बदल, फेरफार अल्प बदल किंवा सुधारणा करता येतील.

**७.२ अडचणी दूर करण्याचे अधिकार**

या विनियमातील कोणत्याही तरतुदीची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही तरतूद, जी अडचण दूर करण्यासाठी आवश्यक असेल, आयोग साधारण किंवा विशेष आदेशाने करु शकेल.

(प्र. बा. पाटील )
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियमक आयोग,

मुंबई,

दिनांक १९ डिसेंबर, २००८